आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात मुंबई, ठाण्यासह राज्यभरात पावसाचं थैमान/गेल्या चोवीस तासांत सहा जणांचा मृत्यू तर ३ जण बेपत्ता
- मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पुणे दौरा रद्द
- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ५७ टक्के मतदान/तिसऱ्या टप्प्याच्या प्रचाराला जोर
- देशातल्या नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चात घट झाल्याची आरोग्य मंत्रालयाच्या अहवालात माहिती

  **आणि**

- युक्रेनला अण्वस्त्र पुरवणारा देश युद्धात सहभागी असल्याचं मानलं जाईल, असा रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचा इशारा

**<><><><><>**

महाराष्ट्रात मुंबईसह अनेक ठिकाणी काल मुसळधार पावसाने थैमान घातलं. मुंबईतले अनेक रस्ते जलमय झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. पाऊस आणि वादळामुळे विमानतळावरची १६ उड्डाणं वळवण्यात आली. तसंच, अनेक रेल्वेगाड्याही थांबवाव्या लागल्या. मुसळधार पावसामुळे मुंबई, ठाणे, पालघर पालिकाक्षेत्रातल्या सर्व शाळांना आज सुट्टी जाहीर झाली आहे.

**राज्यात गेल्या २४ तासांत ६ जणांचा** मृत्यू झाला असून २ जण जखमी तर ३ जण बेपत्ता आहेत. मुंबईत अंधेरीत पर्जन्य जलवाहिनीत कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला असून या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

**पालघर** आणि **नाशिक** या दोन जिल्ह्यांना आज पावसाचा रेड अलर्ट तर **मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, धुळे** आणि **नंदुरबार** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**पुणे शहर** आणि परिसरात काल दुपारनंतर अतिवृष्टिमुळं जनजीवन ठप्प झालं. खडकवासला धरण साखळीतून पाणी सोडण्यात येत असल्यानं सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात इतरही जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरु असून, पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग केला जात असून, प्रशासनानं अनेक गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. **रत्नागिरी** जिल्ह्यात कालपासून जोरदार पाऊस सुरू आहे. जगबुडी नदी इशारा पातळीवरून वाहत आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९९ टक्क्यावर पोहोचला असून धरणाच्या १८ दरवाजांमधून सध्या ३७ हजार ७२८ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

**लातूर** आणि **धाराशिव** जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या निम्न तेरणा, **हिंगोली** जिल्ह्यातल्या इसापूर तर **बीड** जिल्ह्यातल्या मांजरा धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सातारा जिल्ह्यातल्या **कण्हेर** आणि उरमोडी धरणातून आज सकाळपासून विसर्ग करण्यात येत आहे. **धुळे** जिल्ह्यातही अनेक धरणांमधून पाणी सोडण्यात येत आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांचा आजचा नियोजित पुणे दौरा रद्द झाला आहे. मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे हा दौरा रद्द झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. राज्यातल्या २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार होतं.

<><><><><>

एशियन इंफ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेच्या ९व्या वार्षिक बैठकीच्या पार्श्वभूमीवर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल समरकंदमध्ये उझबेकिस्तानचे राष्ट्रपती शवकत मिर्जियोयेव यांची भेट घेतली.  डिजिटल तंत्रज्ञान, फिनटेक, कृत्रिम बुद्धिमत्ता, अक्षय ऊर्जा, अणुऊर्जेचा नागरी उपयोग, आरोग्यसेवा आणि फार्मा क्षेत्रातल्या सहकार्याला चालना देण्यासाठी दोन्ही देशांदरम्यान यावेळी चर्चा झाली.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी काल न्यूयॉर्कमध्ये जी-२० देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत भाग घेतला. ब्राझीलचे अध्यक्ष लुला दा सिल्वा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. जागतिक प्रशासनात सुधारणा करण्यासाठी आवश्यक तीन प्रमुख क्षेत्रांवर त्यांनी भारताचे विचार मांडले. भारताच्या जी-20 अध्यक्षपदाच्या काळात जागतिक नेत्यांनी विकास वाढीचा आणि हवामानासाठी आर्थिक व्यवस्थेचा विस्तार करण्याचं आवाहन जयशंकर यांनी यावेळी केलं.

<><><><><>

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल ५७ टक्के मतदान झालं. सहा जिल्ह्यातल्या २६ मतदारसंघात मतदान शांततेत पार पडलं. श्री माता वैष्णो देवी मतदारसंघात सर्वाधिक ८० पूर्णांक ७४ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली, तर सुर्णकोट मध्ये ७४ पूर्णांक ९५ शतांश आणि पूँछ हवेली मध्ये ७४ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.  जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याने मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी समाधान व्यक्त केलं. केंद्रशासित प्रदेशातल्या नागरिकांनी लोकशाही व्यवस्थेवर विश्वास दाखवला आहे,

असं ते म्हणाले. दरम्यान, तिसऱ्या टप्प्यातलं मतदान १ ऑक्टोबरला होणार असून ८ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या प्रचारासाठी विविध राजकीय पक्षांचा प्रचार सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जम्मू इथं प्रचारसभा घेणार आहेत. कठुवा आणि उधमपूर जिल्ह्यातल्या चार प्रचारसभांना ते संबोधित करतील.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २८ सप्टेंबरला जम्मू इथं प्रचारसभा घेणार आहेत. दरम्यान, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जम्मूमध्ये प्रचारसभा घेतली. तसंच माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनीही आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी सभा घेतली.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज कर्नाल इथं सभा घेणार आहेत. असांध मतदारसंघातल्या प्रचारसभेत ते संबोधित करतील. त्यानंतर ते हिसार जिल्ह्यात प्रचारसभा घेणार आहेत.

<><><><><>

भारतामध्ये सर्वसामान्य नागरिकांना एकंदर आरोग्य सुविधांसाठी आपल्या खिशातून कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये मोठी घट झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे प्रमाण ६४ पूर्णांक दोन शतांश टक्के होतं, ते २०२१ मध्ये ३९ पूर्णांक चार दशांश टक्क्यांवर आलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षांसाठीचा राष्ट्रीय आरोग्य योजनांबाबतचा अहवाल काल प्रकाशित केला. त्यातून ही बाब समोर आली आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातही सरकारनं आरोग्य

क्षेत्रावर केलेल्या खर्चाचं प्रमाण १ पूर्णांक १३ शतांश टक्क्यांवरून वाढून १ पूर्णांक ८४ शतांश टक्क्यांवर पोचल्याचं या अहवालातून स्पष्ट झालं आहे.

नागरिकांना त्यांच्या खिशातून कराव्या लागणाऱ्या खर्चात घट होणं ही गोष्ट अतिशय सकारात्मक असल्याचं नीती आयोगाचे आरोग्य विभागासाठीचे सदस्य डॉक्टर व्ही. के. पॉल यांनी सांगितलं. आयुष्मान भारत, प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमुळेच सर्वसामान्यांचे एक लाख कोटी रुपये वाचले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. १-१५-१६ मध्ये सुरू करण्यात आलेल्या विनामूल्य डायलिसिस योजनेचा २५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांना लाभ झाल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना शिवडी दंडाधिकारी न्यायालयाने आज १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजारांचा दंड ठोठावला आहे. मीरा भाईंदर शहरातल्या शौचालय कंत्राटावर केलेल्या विधानामुळे मेधा सोमय्या यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. मीरा भाईंदर पालिका क्षेत्रातली १५४ सार्वजनिक शौचालयं बांधण्याचं कंत्राट मेधा सोमय्या यांच्या संस्थेला मिळालं होतं. मात्र, या कंत्राटात घोटाळा झाल्याचा आरोप संजय राऊत यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला होता.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेशातले तीन जिल्हे आणि नामसाई जिल्ह्यातील काही भागांत सशस्त्र बल विशेषाधिकार अधिनियम अर्थात अफस्पाला आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय गृह मंत्रालयानं घेतला आहे. येत्या एक ऑक्टोबरपासून ही मुदतवाढ लागू होईल.

अरुणाचल प्रदेशातील तिरप, चांगलांग आणि लोंगडिंग जिल्ह्यात तसंच नमसाई जिल्ह्यासह महादेवपूर आणि चौखम पोलिस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रातील भाग

अशांत म्हणून जाहीर केल्याचं गृहमंत्रालयानं या संदर्भात काढलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

नागालँडमधील आठ जिल्हे आणि पाच जिल्ह्यांतील काही भागांतही अफस्पा ला सहा महिने मुदतवाढ दिली आहे. यात दीमापूर, न्यूलँड,चुमौकेदिमा, मोन, किफिरे,  नोकलाक, फेक आणि पेरेन या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**<><><><>**

रशिया विरुद्धच्या युद्धात यूक्रेनला अण्वस्त्र पुरवल्यास संबंधित देशही त्या युद्धात सहभागी असल्याचं मानलं जाईल, असा इशारा रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिला आहे. मॉस्को इथं काल झालेल्या रशियाच्या सुरक्षा परिषदेत ते बोलत होते. यूक्रेनने या युद्धात लांब पल्ल्याच्या पाश्चात्त्य क्षेपणास्त्रांचा वापर करण्यासाठी अमेरिका आणि युरोपमधल्या आपल्या मित्र राष्ट्रांकडून परवानगी मागितली आहे, असं यूक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

हिजबुल्लाह आणि इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांनी लेबननमध्ये प्रवास न करण्याचं आवाहन बैरुतमधल्या भारतीय दुतावासाने केलं आहे.  पश्चिम आशियाई देशात प्रवास करू नये आणि लेबनन तात्काळ सोडावं असंही भारतीय दुतावासाने म्हटलं आहे. ज्यांना तिथं राहणं आवश्यक आहे त्यांनी आवश्यकता नसेल तर बाहेर पडू नये असंही दुतावासाने म्हटलं आहे.

दरम्यान, इस्रायलने लेबननमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात ५५८ जणांचा मृत्यू झाला असून अठराशे जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ५० बालकांचा समावेश आहे.

**<><><><>**

भारतीय हवामान विभागाने आज कोकण, गोव्यासह महाराष्ट्र, गुजरात, सिक्कीम आणि पश्चिम बंगालच्या काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उद्या उत्तर प्रदेश, सौराष्ट्र, कच्छ आणि अरुणाचल प्रदेशात जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज आहे.